श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## मासिक.

वर्ष १७] शके १८६२ पौष. [अंक १०

बाबा बाबा, निशिदिनिं मना घोक रे घोक बाबा ॥
बाबा नामीं, कितितरी असे दिव्य जादू अगाधा ॥



त्या बाळिरूं, त्यज शरण जा त्या न भूपा नवाबा ॥
त्या बाबा ना, तुज यमगृहीं जावयाची उबाबा ॥

नळिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम् ॥
क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका ॥१॥

—शंकराचार्य

संपादक—रामचंद्र वासुदेव घैसास

# अनुक्रमणिका

संपादकीय ... ... ... ... .... ...
साईनाथ स्तवनमंजरी ... ... ... ... .... ३३५
श्री साईसच्चरित्र ... ... ... ... ... .... ३५१
अनुभव .... ... .... ... ... ... ६५

## श्रीसाईभक्तांस विनंती

साईलीलेचें वर्ष चैत्र महिन्यापासून सुरू होतें. तरी अंक सुरु करणें झाल्यास चैत्रापासून वर्गणीदार झालें पाहिजे.

पुष्कळ भक्तमंडळींच्या पत्त्यांत फेरफार झाल्यामुळें त्यांना पोष्टांतून पाठविलेल्या उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका व प्रसाद न पोहचतां परत येतात. तरी कृपा करून त्यांनीं आपले पत्ते फेरबदल झाल्यास ऑ. चिटणीस रा. रा. श्री. ना. खारकर, ३७ चर्नी रोड, ठाणें यांस कळवावें.

भक्तांनीं आपलें अनुभव श्री साईलिलेंत प्रसिद्ध करण्याकरितां कृपाकरून खालील पत्त्यावर पाठवावेत. ज्यांना आपलें नांव प्रसिद्ध होणें नको असेल त्यांनीं आपलें टिपण नांव व आपला पत्ता कळवावा म्हणजे तशी व्यवस्था होईल.

## वर्गणीदारांस विनंती

ज्यांनीं चालू सालची म्हणजे शके १८६२ ची वर्गणी ३ रु. ६ आणे अद्याप पाठविली नाहीं, त्यांनीं कृपाकरून ती खालील पत्त्यावर मनिऑर्डरनें पाठवून द्यावी अथवा व्ही. पी. करण्याचें सुचवावें, म्हणजे ३ रु. ९ आ. ची व्ही. पी. करणेंत येईल.

रा. वा. धैसास, सम्पादक.
लो. टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नंबर २
गोखले रोड नॉर्थ; दादर, मुम्बई १४.



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदकपार्श्वतो योजनैकम् ॥
प्रादुर्भूत्वाऽत्रभूत्याऽनिशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः॥

शके १८६२ )　श्रीसद्गुरु साईनाथ　( वर्ष १७ अंक १०

## संपादकीय

लीलेचे कार्य शके १८५९ पासून मागासलेले होते, कारण उत्साही कार्यवाहकाची वाण, व साईलीला वर्गणीदारांस वक्तशीर मिळेना असें झाल्यामुळें लीलेच्या वर्गणीदारांची संख्या पांचसातशें वरून घटून आज मितीस अवघी सव्वाशेंवर आली आहे. तींचें ( साईलीलेचें ) पुनरुज्जीवन व्हावें व ती बंद पडूं नये अशी बऱ्याच साईभक्तांनीं इच्छा प्रदर्शीत केल्यानें संस्थाननें गेलीं दोन वर्षें आर्थिक झीज सात आठशे रुपये सोसून शके १८५९ ते १८६१ पर्यंतचे लीलेचे काम त्रैमासिक रूपानें पुरे करून शके १८६२ चे साल मासिक रूपानें सूरुं केले.

लीलेच्या रुपरेखेंत बराच बदल करून तिचे कार्य भक्तास पसंत होईल असें प्रयत्न करूनही वर्गणीदारांचे संख्येत मुळींच भर पडलेली नाही. चालू साल पूरे होणेस अद्याप अवघे तीनचमहीने उरले आहेत त्या महिन्यांचे ( अंक ) मासिक वेळचे वेळीं प्रसिद्ध होईलच. परंतु शंभर सव्वाशे वर्गणीदारावरच कमित कमी सात आठशे रुपयांचा वार्षिक खर्चाचा बोजा संस्थानला झेपणें शक्य नाहीं. यामुळें पुढच्यासाली लीला चालू ठेवणेचा प्रश्न संस्थानला बिकट आहे. तरींही चालू वर्षाचे उरलेले तीन महिन्याचे अवधींत लीलेचे वर्गणीदार वाढविणेंचे प्रयत्न तमाम बाबा भक्तांनीं करावें; व ते निदान तीनशे पर्यंत वाढविल्यास संस्थान कमिटी लीला चालू ठेवणें बद्दल विचार करील.

श्री साईबाबांच्या कृपेनें लीलेचे वर्गणीदार चारशे अगर अधिक वाढल्यास लीलेची वर्गणी कमी करणेचा प्रश्न संस्थान कमिटी हाती घेईल. तेव्हां सर्व साईभक्तांनीं आपलीं नांवे पुढच्या सालच्या म्हणजे शके १८६३ सालच्या श्री साईलीला मासिकाच्या यादींत नोंदवावीं; व तिचे ( श्री साईलीला ) अशीच पुढें चालू ठेवणेंचे श्रेय तिचे ( साईलीलेचे ) वर्गणीदार वाढवून संपादन करावें. अशी तमाम बाबा भक्तास पुनः पुनः नम्र विनंति आहे.

संपादक



ह. भ. प. दासगणू महाराज



श्री साईबाबा

# ह. भ. परायण दासगणूकृत

## श्रीसाईनाथ स्तवन मंजरी

श्रीगणेशायनमः । हे सर्वाधारामयूरेश्वरा । सर्वसाक्षी गौरी कुमरा ।।
हे अचिंत्या लंबोदरा । पाहिमां श्री गणपते ।। १ ।।

तूं सकल गणांचा आदि ईश । म्हणून म्हणती गणेश ।।
तूं संमत सर्व शास्त्रांस । मंगलरूपा भालचंद्रा ।। २ ।।

हे शारदे वाग्विलासिनी । तूं शब्द सृष्टी स्वामिनी ।।
तुझें अस्तित्व म्हणूनी । व्यवहार चालती जगताचे ।। ३ ।।

तूं ग्रंथकाराची देवता । तूं भूषण देशाचें सर्वथा ।।
तुझी अवघ्यांत अगाध सत्ता । नमो तुजसी जगदंबे ।। ४ ।।

हे पूर्णब्रह्मा संतप्रिया । हे सगुणरूपा पंढरीराया ॥
कृपार्णवा परम सदया । पांडुरंगा नरहरे ॥ ५ ॥

तूं अवघ्यांचा सूत्रधार । तुझी व्याप्ती जगभर ॥
अवघीं शास्त्रें विचार । करिती तुझ्या स्वरुपाचा ॥ ६ ॥

पुस्तकज्ञानी जे जे कोणी । त्या तूं न गवससी चक्रपाणी ॥
त्या अवघ्या मूर्खांनीं । शब्दवाद करावा ॥ ७ ॥

तुला जाणती एक संत । बाकीचे होती कुंठित ॥
तुला माझा दंडवत । आदरें हा अष्टांगीं ॥ ८ ॥

हे पंचवक्त्रा शंकरा । हे नररुंड मालाधरा ॥
हे नीलकंठादिगंबरा । ॐमकाररूपा पशुपते ॥ ९ ॥

तुझें नाम ज्याचे ओठीं । त्याचें दैन्य जाय उठाउठी ॥
ऐसा आहे धूर्जटी । महिमा तुझ्या नांवाचा ॥ १० ॥

तुझ्या चरणा वंदून । मी हें स्तोत्र करितों लेखन ॥
यास करावें साह्य पूर्ण । तूं सर्वदां नीलकंठा ॥ ११ ॥

आतां वंदू अत्रीसुता । इंदिराकुलदैवता ॥
श्रीतुकारामादि सकल संतां । तेवीं अवघ्या भाविकांसीं ॥ १२ ॥

जयजयाजी साईनाथा । पतीत पावना कृपावंता ॥
तुझ्या पदीं ठेवितों माथा । आतां अभय असूं दे ॥ १३ ॥

तूं पूर्ण ब्रह्म सौख्य धामा । तूंच विष्णू नरोत्तमा ॥
अर्धांगी ती ज्याची उपमा । तो कामारी तूंच कीं ॥ १४ ॥

तूं नरदेह धारी परमेश्वर । तूं ज्ञान नभींचा दिनकर ॥
तूं दयेचा सागर । भवरोगां औषधी तूं ॥ १५ ॥

तूं हीनदीनां चिंतामणी । तूं तत्र भक्तां स्वर्धुनी ॥
तूं बुडतियांनां भव्य तरणी । तूं भीतासी आश्रय ॥ १६ ॥
जगाचें आद्य कारण । जें कां विमल चैतन्य ॥
ते तुम्हींच अहा दयाघन । विश्व हा विलास तुमचाची ॥ १७ ॥
आपण जन्मरहीत । मृत्युही ना आपणाप्रत ॥
तेच अखेर कळून येत । पूर्ण विचारें शोधितां ॥ १८ ॥
जन्म आणि मरण । हीं दोन्हीही अज्ञानजन्य ॥
आपण दोहोंपासून । अलिप्त मुळींच महाराजा ॥ १९ ॥
पाणी झऱ्यांत प्रगटलें । म्हणून कां तेथ उपजलें ॥
तें पूर्वीच होतें पूर्ण भरलें । आलें मात्र आंतुनी ॥ २० ॥
त्याचेंत आलें जीवन । म्हणून लाधलें अभिधान ॥
झरा ऐसें तिज लागून । जलाभावीं त्याचची ॥ २१ ॥
लागला आणि आटला । हें मुळीं ठावें न जला ॥
कांकीं जल त्याचेला । देत नव्हतें महत्व मुळीं ॥ २२ ॥
त्याचेसीं मात्र अभिमान । जीवनाचा परिपूर्ण ॥
म्हणून तें आटतां दारूण । दैन्यावस्था ये तिशीं ॥ २३ ॥
नरदेहही त्यांच खरी । शुद्ध चैतन्य विमलवारी ॥
त्यांचा अनंत होती जरी । परी न पालट तोयाचा ॥ २४ ॥
म्हणून आजन्मा आपणां । मी म्हणतसे दयाघना ॥
अज्ञान नगाच्या कंदना । करण्या व्हावें वज्र तुम्ही ॥ २५ ॥
ऐशा त्यांचा आजवर । बहूत झाल्या भूमीवर ॥
हल्लीं अजून होणार । पुढेंही कालावस्थेनें ॥ २६ ॥

त्या प्रत्येक खांचेप्रत । निराळें नांवरूप मिळत ॥
जेणें करून जगतांत । ओळख त्यांची पटतसे ॥ २७ ॥

आतां चैतन्याप्रत । मी तूं म्हणणें ना उचित ॥
कांकीं न जेथें संभवे द्वैत । तेंच चैतन्य निश्चयें ॥ २८ ॥

आणि त्यासी चैतन्याची । अवघ्या जगाठाईं साची ॥
मग मी तूं या भावनेची । संगत कैशी लागते ॥ २९ ॥

जल मेघगर्भींचें । एकपणें एकसाचें ॥
अवतरणें भूवरी होतां त्याचें भेद होती अनेक ॥ ३० ॥

जें गोदेच्या पात्रांत । तें गोदा म्हणून वाहिलें जात ॥
जें पडे कूपांत । तैसी न त्याची योग्यता ॥ ३१ ॥

संत रूप गोदावरी । तेथील तुम्हीं अहा वारी ॥
आम्हीं थिल्लर कूप सरोवरीं । म्हणून भेद तुम्हां आम्हां ॥ ३२ ॥

आम्हां न्हावया कृतार्थ । आलें पाहिजे तुम्हांप्रत ॥
शरण सर्वदा जोडून हात । कां कीं पवित्रता तुम्हां ठाई ॥ ३३ ॥

पात्रामुळें पवित्रता । आली गोदा जलासी सर्वथा ॥
नुसत्या जलांत पाहतां । तें एकपणें एकची ॥ ३४ ॥

पात्र गोदावरींचें । जें कां ठरलें पवित्र साचें ॥
तें ठरण्यात भूमीचे गुणदोष झाले साह्य पहा ॥ ३५ ॥

मेघगर्भींच्या उदकाला । जो भूमी भाग न बदलवी भला ॥
त्याच भूमीच्या भागाला । गोदा म्हणाले शास्त्रवेत्ते ॥ ३६ ॥

इतरत्र जें जल पडलें । त्यानें पादगुणा स्वीकारलें ॥
रोगी कडूखारट झालें । मूळचें गोड असूनी ॥ ३७ ॥

तैसें गुरुवरा आहे येथ । षड्रिपूंची न घाण जेथ ॥
त्या पवित्र पिंडाप्रत । संत अभिधान शोभतसे ॥ ३८ ॥
म्हणून संत ती गोदावरी । मी म्हणतों साजिरी ॥
अवघ्या जीवांत आहे खरी । आपुली श्रेष्ठ योग्यता ॥ ३९ ॥
जगदारंभापासून । गोदा आहेच निर्माण ॥
तोयही भरलें परिपूर्ण । तुटी न झाली आजवरी ॥ ४० ॥
पहा जेव्हा रावणारी । येता झाला गोदातिरीं ॥
त्या वेळचें तेथील वारी । टिके कोठून आजवरी ॥ ४१ ॥
पात्रमात्र तेंच उरलें । जल सागरा मिळाले ॥
पावित्र्य कायम राहिले । जल पात्राचें आजवरी ॥ ४२ ॥
प्रत्येक संवत्सरीं । जुनें जाऊनी नवें वारी ॥
येत पात्राभीतरी । तोच न्याय तुम्हां ठाया ॥ ४३ ॥
शतक तेंच संवत्सर । त्या शतकांतील साधूवर ॥
हेंच जल साचार ॥ नाना विभूती ह्या लाटा ॥ ४४ ॥
या संतरूप गोदेसीं । प्रथम संवत्सरासीं ॥
पूर आला निश्चयेसीं । सनत्सनक सनंदनाचा ॥ ४५ ॥
मागून नारद तुंबर । ध्रुव प्रल्हाद बलि नृपवर ॥
शबरी अंगद वायूकुमर । विदूर गोपगोपिका ॥ ४६ ॥
ऐसे बहूत आजवरी । प्रत्येक शतकामाझारीं ॥
पूर आले वरच्यावरी । ते वर्णण्या अशक्य मी ॥ ४७ ॥
या सांप्रतच्या शतकांत । संतरूप गोदेप्रत
आपण पूर आलांत । साइनाथा निश्चयें ॥ ४८ ॥

म्हणून तुमच्या दिव्य चरणा । मी करितां वंदना ।
महाराज माझ्या दुर्गुणा । पाहूं नका किमपीही ॥ ४९ ॥

मी हीन दीन अज्ञानी । पातक्यांचा शिखामणी ॥
युक्त अवघ्यां कुलक्षणांनीं परि अव्हेर करूं नका ॥ ५० ॥

लोहा अंगींचें दोष । मना न आणी परीस ॥
गांवींच्या लेंड्या ओहोळास । गोदा न लावी परतवूनि ॥ ५१ ॥

माझ्यामधील अवघी घाण । आपल्या कृपाकटाक्षें करून ॥
करा करा वेगें हरण । हीच विनंती दासाची ॥ ५२ ॥

परिसाचा संग होऊन । लोहाचें ते लोहपण ॥
जरी न होय गुरुवरा हरण । तरी हीनत्व परिसाशीं ॥ ५३ ॥

मला पापी ठेवूं नका । आपणा हीनत्व घेऊं नका ॥
आपण परीस मी लोह देखा । माझी चाड आपणांते ॥ ५४ ॥

बालक अपराध सदैव करिते । परी न माता रागावते ॥
हें आणून ध्यानातें । कृपा प्रसाद करावा ॥ ५५ ॥

हे साइनाथा सद्गुरु । तूंच माझा कल्पतरू ॥
भवाब्धीचे भव्य तारूं । तूंच असशी निश्चयें ॥ ५६ ॥

तूं कामधेनू चिंतामणी । तूं ज्ञान नभींचा वासरमणी ॥
तूं सद्गुणाची भव्य खाणी । अथवा सोपान स्वर्गींचा ॥ ५७ ॥

हे पुण्यवंता परम पावना । हे शांत मूर्ते आनंदघना ॥
हे चित्स्वरूपा परिपूर्णा । हे भेदरहित ज्ञान सिंधो ॥ ५८ ॥

हे विज्ञान मूर्ति नरोत्तमा । हे क्षमाशांतीच्या निवासधामा ॥
हे भक्त जनाच्या विश्रामा । प्रसीद प्रसीद मजप्रती ॥ ५९ ॥

तूंच सद्‌गुरू मछिंदर । तूंच महात्मा जालंदर ॥
तूं निवृत्तिनाथ ज्ञानेश्वर । कबीर शेखनाथ तूं ॥ ६० ॥
तूंच बोधला सांवता । तूं रामदास तत्वता ॥
तूंच तुकाराम साइनाथा तूंच सखा माणिक प्रभू ॥ ६१ ॥
या अपुल्या अवताराची ॥ परी आहे अगम्य साची ॥
ओळख आपुल्या जातीची । होऊं न देतां कवणातें ॥ ६२ ॥
कोणी आपणा म्हणति यवन । कोणी म्हणती ब्राह्मण ॥
ऐसी कृष्णासमान । लीला आपण मांडिली ॥ ६३ ॥
श्रीकृष्णास पाहून । नाना प्रकारें वदले जन ॥
कोणी म्हणाले यदुभूषण । कोणी म्हणाले गुराखी ॥ ६४ ॥
यशोदा म्हणे सुकुमार बाळ । कंस म्हणे हा महाकाळ ॥
उद्धव म्हणे प्रेमळ । अर्जुन म्हणे ज्ञानजेठीं ॥ ६५ ॥
तैसें गुरुवरा आपणासीं । जें ज्याच्या मानसीं ॥
योग्य वाटेल निश्चयेसीं । तें तें तुम्हां तो म्हणतसे ॥ ६६ ॥
मशीद आपुले वसतिस्थान । विंधावाचून आहेत कर्ण ॥
फांत्याच्या तऱ्हा पाहून । यवन म्हणणें भाग तुम्हां ॥ ६७ ॥
तैसी अग्नीची उपासना । पाहूनि आपुली दयाघना ॥
निश्चय होत आम्हुच्या मना । कीं आपण हिंदू म्हणूनी ॥ ६८ ॥
परी भेद हे व्यवहारीक । यातें चाहतील तार्किक ॥
परी जिज्ञासू भाविक । त्यां न वाटे महत्व यांचें ॥ ६९ ॥
आपुली आहे ब्रम्हास्थिती । जात गोत ना आपणाप्रती ॥
आपण अवघ्यांचे गुरुमूर्ती । अहां आद्यकारण ॥ ७० ॥

यवन हिंदूंचे विपट आलें । म्हणून तदैक्य करण्या भलें ॥
मशीद अग्नीला स्वीकारिलें । लीला भक्तांस दावावया ॥ ७१ ॥

आपण जातगोतीत । सद्वस्तू जी का सत ॥
तीच तुम्ही साक्षात । तर्कातीत सांचकीं ॥ ७२ ॥

तर्क वितर्कांचें घोडें । चालेल किती आपणांपुढें ॥
तेथें माझें बापुडें । शब्द टिकतील कोठुनी ॥ ७३ ॥

परी पाहुनी तुम्हाला । मौन नये धरितां मला ॥
कां कीं शब्द हेंच स्तुतीला । साहित्य आहेत व्यवहारीं ॥ ७४ ॥

म्हणून शब्दें करून । जें जें होईल वर्णन ॥
तें तें सर्वदा करीन । आपुल्या कृपाप्रसादें ॥ ७५ ॥

संताची योग्यता भली । देवाहून आगळी ॥
अजादुजास नाहीं मुळीं । स्थान जवळ साधुंच्या ॥ ७६ ॥

हिरण्यकश्यपू रावणाला । देवद्वेषें मृत्यु आला ॥
तैसा एकही नाहीं घडला । प्रकार संत हस्तानें ॥ ७७ ॥

गोपीचंदें उकीरड्यासी । गाडिलें जालंदरासी ॥
परी त्या महात्म्यासी । नाहीं वाटला विषाद ॥ ७८ ॥

उलट राजाचा उद्धार केला । चिरंजीव करूनी सोडिला ॥
ऐशा संताच्या योग्यतेला । वर्णन करावें कोठवरीं ॥ ७९ ॥

संत सूर्य नारायण । कृपा त्यांची प्रकाशपूर्ण ॥
संत सुखद रोहिणी रमण । कौमुदी ती तत्कृपा ॥ ८० ॥

संत कस्तुरी सोज्वळ । कृपा त्याची परिमळ ॥
संत इक्षू रसाळ । रस नव्हाळी तत्कृपा ॥ ८१ ॥

संत सुष्टदुष्टांप्रती । समसमान निश्चिती ॥
उलट पाप्यावरी प्रीती । अलोट त्यांची वसतसे ॥ ८२ ॥

गोदावरी जलांत । मळकट तेंच धुवाया येत ॥
निर्मळ तें संदुकींत । राहे लांब गोदे पूनी ॥ ८३ ॥

जे संदुकीमध्ये वसलें । तेंही वस्त्र एकदां आलें ॥
होते ध्वावयालागीं भलें । गोदावरीचें पात्रांत ॥ ८४ ॥

येथें संदूक वैकुंठ । गोदा तुम्हीं निष्ठाघाट ॥
जीवात्मे हेच पट । षड्विकार मळ त्यांचा ॥ ८५ ॥

तुमच्या पदाचें दर्शन । हेंच आहे गोदा स्नान ॥
अवघ्या मळातें घालवून । पावन करणें समर्था ॥ ८६ ॥

आम्हीं जन हें संसारीं । मळत आहों वरच्यावरी ॥
म्हणून आम्हींच अधिकारी । संतदर्शन घेण्यास्तव ॥ ८७ ॥

गौतमी माजी विपूल नीर । आणि धुणें मळकट घाटांवर ॥
तेंसंच पडल्या साचार । त्याचें हीनत्व गोदेसी ॥ ८८ ॥

तुम्ही सघन शीततरूवर । आम्हीं पांथस्थ साचार ॥
तापत्रयाचा हा प्रखर । तापलासे चंडांशू ॥ ८९ ॥

त्याच्या तापापासून सदया । करा रक्षण गुरुराया ॥
सत्कृपेची शीतळ छाया । आहे आपुली लोकोत्तर ॥ ९० ॥

वृक्षाखालीं वैसून । जरी लागतें वरून ऊन ॥
तरी त्या तरूलागून । छाया तरू कोण म्हणे ॥ ९१ ॥

तुमच्या कृपेवीण पाही । जगांत वरें होणें नाहीं ॥
अर्जुनाला शेषशाई । सखा लाधला धर्मास्तव ॥ ९२ ॥

सुग्रीव कृपेनें बिभीषणा । लाधलासे रामराणा ॥
संतामुळेंच मोठेपणा । लाधला श्रीहरीसी ॥ ९३ ॥

ज्याचें वर्णन वेदासी । न होय ऐशा ब्रम्हासीं ॥
सगूण करवून भूमीसी । लाजविलें संतांनींच ॥ ९४ ॥

दामाजीनें बनविला महार । वैकुंठपती रुक्मीणीवर ॥
चोखोबानें उचलण्या ढोरें । राबविलें त्या जगदात्मया ॥ ९५ ॥

संतमहत्व जाणून । पाणी वाही जगज्जीवन ॥
संत खरेंच यजमान । सच्चिदानंद प्रभूचें ॥ ९६ ॥

फार बोलणें नलगे आतां । तूंच आम्हां माता पिता ॥
हे सद्‌गुरु साइनाथा । शिर्डि ग्रामनिवासिया ॥ ९७ ॥

बाबा तुमच्या लीलेचा । कोणा न लागे पाड, साचा ॥
तेथें माझी आर्षवाचा । टिकेल सांगा कोठून ॥ ९८ ॥

जड जीवांच्या उद्धारार्थ । आपण आला शिर्डीत ॥
पाणी ओतून पणत्यांत । दिवे तुम्हीं जाळिलें ॥ ९९ ॥

सवाहात लाकडाची । फळी मंचक करून साची ॥
आपुल्या योगसामर्थ्याची । शक्ति दाविली भक्तजना ॥ १०० ॥

वांझपणा कैकांचा । तुम्ही केलांत हरण साचा ॥
कित्येकांच्या रोगांचा । वीं मोड केलांत उदीनें ॥ १०१ ॥

वारण्या ऐहिक संकटे । तुम्हां न कांहीं अशक्य वाटे ॥
पिपीलिकेचें कोठून मोठें । ओझें मानी जगपती ॥ १०२ ॥

असो आतां गुरुराया । दीनावरी करा दया ॥
मी तुमच्या लागलों पाया । मागें न लोटा मजलागी ॥ १०३ ॥

तुम्ही महाराज राजेश्वर । तुम्हीं कुबेराचे कुबेर ॥
तुम्ही वैद्यांचे वैद्य निर्धार । तुम्हांविण ना श्रेष्ठ कोणी ॥ १०४ ॥

अवांतराचे पूजेस । साहित्य आहे विशेष ॥
परी पूजाया तुम्हांस । जगीं पदार्थ न राहिला ॥ १०५ ॥

पहा सूर्याचिया घरीं । सण दिपवाळी आली खरीं ॥
परि ती त्यानें साजिरी । करावी कोणत्या द्रव्यें ॥ १०६ ॥

सागराची शमवावया । तहान जल ना महीठाया ॥
वन्हीलागीं शेकावया । अग्नी कोठून द्यावा तरी ॥ १०७ ॥

जे जे पदार्थ पूजेचे । ते ते तुमच्या आत्म्याचे ॥
अंश आधींच असती साचे । श्रीसमर्था गुरुराया ॥ १०८ ॥

हें तत्व दृष्टीचें बोलणें । परी न तैशी झालीं मनें ॥
बोललों अनुभवाविणें । शब्दजाल निरर्थक ॥ १०९ ॥

व्यवहारीक पूजन जरी । तुमचें करूं मी सांगा तरी ॥
तें कराया नाहीं पदरीं । सामर्थ्य माझ्या गुरुराया ॥ ११० ॥

बहुतेक करून कल्पना । करितों तुमच्या पूजना ॥
तेंच पूजन दयाघना । मान्य करा या दासाचें ॥ १११ ॥

आतां प्रेमाश्रु करून । तुमचें प्रक्षालितों चरण ॥
सद्भक्तीचें चंदन । उगाळून लावितों ॥ ११२ ॥

कफनी शब्दालंकाराची । घालितों ही तुम्हां साची ॥
प्रेमभाव या सुमनाची । माळा गळ्यांत घालितों ॥ ११३ ॥

धूप कुत्सितपणाचा । तुम्हांपुढें जाळितों साचा ॥
जरी तो वाईट द्रव्याचा । परी न सुटेल घाण त्यासीं ॥ ११४ ॥

सद्गुरुविण इतरत्र । जे जे धूप जाळितात ॥
त्या धूप द्रव्याचा तेथ । ऐसा प्रकार होतसे ॥ ११५ ॥

धूप द्रव्यास अग्नीचा । स्पर्श होताक्षणीं साचा ॥
सुवास सद्गुण तदंगींचा । जात त्याला सोडूनि ॥ ११६ ॥

तुमच्या पुढें उलटें होतें । घाण तेवढी अग्नींत जळतें ॥
सद्गुण उरती पाहण्यातें । अक्षयीचे जगास ॥ ११७ ॥

मनींचें जळाल्या कुत्सितपण । मलरहित होईल मन ॥
गंगेचें गेल्या गढूळपण । मग ती पवित्र सहजची ॥ ११८ ॥

दीप माया मोहाचा । पाजळितों मी हा साचा ॥
तेणें वैराग्य प्रभेचा । होवो गुरुवरा लाभ मशीं ॥ ११९ ॥

शुद्ध निष्ठेचें सिंहासन । देतों बसाया कारण ॥
त्याचें करूनियां ग्रहण । भक्तिनैवेद्य स्वीकारा ॥ १२० ॥

भक्तीनैवेद्य तुम्हीं खाणें । तद्रस मला पाजणें ॥
कांकीं मी तुमचें तान्हें । पयावरी हक्क माझा ॥ १२१ ॥

मन माझें दक्षणा । ती मी अर्पितों आपणां ॥
जेणें उरेल कर्तेपणा । कशाचाही मजकडे ॥ १२२ ॥

आतां प्रार्थना पूर्वक मात्र । घालितों मी दंडवत ॥
तें मान्य होवो आपणांप्रत । पुण्य श्लोका साईनाथा ॥ १२३ ॥

॥ प्रार्थनाष्टक ॥

॥ श्लोक ॥

शांत चित्ता महाप्रज्ञा । साइनाथा दयाघना ॥
दया सिंधो सत्स्वरूपा । माया तम विनाशना ॥ १ ॥ १२४ ॥

जात गोतातिता सिद्धा । अचिंत्या करुणालया ॥
पाहि मां पाहि मां नाथा । शिर्डी ग्राम निवासिया ॥ २ ॥१२५॥
श्री ज्ञानार्का ज्ञान दात्या । सर्व मंगलकारका ॥
भक्त चित्त मराळा हे । शरणागत रक्षका ॥ ३ ॥ १२६ ॥
सृष्टिकर्ता विरिंची तूं । पाता तूं इंदिरापती ॥
जगत्रया लया नेता । रूद्र तो तूंच निश्चितीं ॥ ४ ॥ १२७ ॥
तुजवीणें रिता कोठें । ठाव नाया महीवरी ॥
सर्वज्ञ तूं साईनाथा । सर्वांच्या हृदयांतरीं ॥ ५ ॥ १२८ ॥
क्षमा सर्वापराधाची । करावी हेंच मागणें ॥
अभक्ती संशयाच्या त्या । लाटा शीघ्र निवारणें ॥ ६ ॥ १२९ ॥
तूं धेनु वत्स मी तान्हें । तूं इंदू चक्रवाक मी ॥
स्वर्नदी रूपत्वत्पादा । आदरें दास हा नमी ॥ ७ ॥ १३० ॥
ठेव आतां शिरीं माझ्या । कृपेचा करपंजर ॥
शोक चिंता निवारावी । गणू हा तव किंकर ॥ ८ ॥ १३१ ॥
या प्रार्थनाष्टकें करून । मी करितों साष्टांग नमन ॥
पापताप आणि दैन्य । माझें निवारा लवलाहीं ॥ १३२ ॥
तूं गाय मी वासरूं । तूं माय मी लेकरूं ॥
माझे विषयीं नको धरूं । कठोरता मानसीं ॥ १३३ ॥
तूं मैलागिरी चंदन । मी कांटेरी झुडप जाण ॥
तूं पवित्र गोदा जीवन । मी महापातकीं ॥ १३४ ॥
तुझें दर्शन होवोनिया । दुर्बुद्धी घाण माझे ठाया ॥
राहिल्या तैशीच गुरुराया । चंदन तुजला कोण म्हणे ॥ १३५ ॥

कस्तुरीच्या सहवासें । मृत्तिका मोल पावतसे ॥
पुष्पासंगे घडतसे । वास मस्तकीं गुरुराया ॥ १३६ ॥

थोराची ती हीच रीती । ते ज्या ज्या गोष्टी ग्रहण करिती ॥
त्या त्या वस्तूना पाववती । ते महत्पदाकारणें ॥ १३७ ॥

भस्म कौपीन नंदीचा । शिवें केला संग्रह साचा ॥
म्हणून त्या वस्तूचा । गौरव होत चहूंकडे ॥ १३८ ॥

गोपरंजनासाठीं । वृंदावनीं यमुना तटीं ॥
काला खेळला जगजेठी । तोही मान्य झाला बुधां ॥ १३९ ॥

तैसा मी तो दुराचारी । परी आहे तुमच्या पदरीं ॥
म्हणून विचार अंतरीं । याचा करा हो गुरुराया ॥ १४० ॥

ऐहिक वा पारमार्थिक । ज्या ज्या वस्तूंस मानील सुख ॥
माझें मन हे निःशंक । त्या त्या तुम्हीं पुरविणें ॥ १४१ ॥

आपुल्या कृपेनें ऐसें करा । मनालागीं आंवरा ॥
गोड केल्या सागरा । क्षारोद्गमनाची नसे भिती ॥ १४२ ॥

सागरा गोड करण्याची । शक्ति आपणामधें साची ॥
म्हणून दास गणूची । याचना हीं पुरी करा ॥ १४३ ॥

कमीपणा जो जो माझा । तो तो अवघा तुझा ॥
सिद्धांचा तूं आहेस राजा । कमीपणा न बरवा तुजशीं ॥ १४४ ॥

आतां कथास्तव बोलूं फार । तूंच माझा आधार ॥
शिशू मातेच्या कडेवर । असल्या निर्भय सहजची ॥ १४५ ॥

असो या स्तोत्रासीं । जे जे वाचतील प्रेमेसी ॥
त्यांच्या त्यांच्या कामनेसी । तुम्हीं पुरवा महाराजा ॥ १४६ ॥

या स्तोत्रास आपुला वर । हाच असो निरंतर ॥
पठणकर्त्यांचे त्रिताप दूर । व्हावे एक संवत्सरीं ॥ १४७ ॥

शुचिर्भूत होऊन । नित्य स्तोत्र करावें पठण ॥
शुद्धभाव ठेवून । आपुलिया मानसीं ॥ १४८ ॥

हें अशक्य असलें जरी । तरी प्रत्येक गुरुवारीं ॥
सद्‌गुरु मूर्ति अंतरीं । आणून पाठ करावा ॥ १४९ ॥

तेंही अशक्य असल्यास । प्रत्येक एकादशीस ॥
वाचणें या स्तोत्रास । कौतुक त्याचें पहावया ॥ १५० ॥

स्तोत्र पाठकां उत्तम गती । अंतीं देईल गुरुमूर्ति ॥
ऐहिक वासना सत्वर गती । त्याची पुरवून श्रोते हो ॥ १५१ ॥

या स्तोत्राच्या पारायणें । मंद बुद्धि होतील शहाणे ॥
कोणा आयुष्य असल्या उणे । तो पठणे होय शतायु ॥ १५२ ॥

धनहीनता असल्या पदरीं । कुबेर येऊन राबेल घरीं ॥
हें स्तोत्र वाचल्यावरी । सत्य सत्य त्रिवाचा ॥ १५३ ॥

संतति हींना संतान । होईल स्तोत्र केल्या पठण ॥
स्तोत्र पाठकाचें संपूर्ण । रोग जातील दिगंतरा ॥ १५४ ॥

भय चिंता निमेल । मान मान्यता वाढेल ॥
अविनाश ब्रह्म कळेल । नित्य स्तोत्राच्या पारायणें ॥ १५५ ॥

धरा बुध हो स्तोत्राविशीं । विश्वास आपुल्या मानसीं ॥
तर्कवितर्क कुकल्पनेशीं । जागा मुळीं देऊं नका ॥ १५६ ॥

शिर्डी क्षेत्राची वारी करा । पाय बाबांचे चित्तीं धरा ॥
जो अनाथांचा सोयरा । भक्तकामकल्पद्रुम ॥ १५७ ॥

त्याच्या प्रेरणे करून । हें स्तोत्र केलें लेखन ॥
मज पामरा हातून । ऐसी रचना होय कैसी ॥ १५८ ॥

शके अठराशें चाळीसांत । भाद्रपद शुद्ध पक्षांत ॥
तिथी गणेश चतुर्थी सत्य । सोमवारी द्वितीय प्रहरीं ॥ १५९ ॥

श्रीसाईनाथ स्तवन मंजिरी । पूर्ण झाली महेश्वरीं ॥
पुनित नर्मदेच्या तिरीं । श्री अहिल्ये सान्निध ॥ १६० ॥

महेश्वर क्षेत्र भलें । स्तोत्र तेथें पूर्ण झालें ॥
प्रत्येक शब्दासीं वदविलें । श्री साईनाथें शिरून मनीं ॥ १६१ ॥

लेखक शिष्य दामोदर । यास झाला साचार ॥
दास गणू मी किंकर । अवघ्या संत महंताचा ॥ १६२ ॥

स्वस्ति श्री साईनाथ स्तवन मंजिरी । तारक हो भवसागरीं ॥
हेंच विनवी अत्यादरीं । दास गणू श्री पांडुरंगा ॥ १६३ ॥

श्री हरिहरार्पणमस्तु । शुभं भवतु । पुंडलीकवरदहरी विठ्ठल ॥
सीताकांतस्मरण जय जय राम । पार्वतीपते हर हर
महादेव ॥ सदगुरू साईनाथ महाराजकी जय ।

॥ श्री सदगुरु साईनाथार्पण मस्तु शुभं भवतु ॥

——:०:——

# श्री साई सच्चरित

## आध्यात्मिक निरीक्षण

### अध्याय ६ वा

( लेखक : सुमन सुन्दर )

वर्षास। होईल उल्हास सर्वत्रां ॥" ६–४७ अशा मौजेखातरच ! उत्सवाचें खरें मर्म कितिजणांना कळलेलें असतें ? मग ज्या बाबांनीं केवळ आपल्या उद्धारार्थच देह घेतला त्यांना आपल्या या अशा वागण्याचा कां राग येऊं नये ? आध्यात्मिक दृष्ट्या जन्मलेल्या जीवाकडे पाहून तो बंधनांत पडलेला म्हणून आपण त्याची कींव केली पाहिजे ! ते आपण मूल जन्मलें कीं आनंदानें जन्मोत्सव करतो ! ज्या रामप्रभुनें केवळ भक्तोद्धारार्थ अवतार घेतला व मुक्तिचा मार्ग निजाचरणें दाखविला त्या रामाचें जन्मरहस्य समजावून घेऊन आत्मशुद्धीं न करतां आपण केवळ मौजेखातर त्याचा जन्मोत्सव साजरा करितो ! ह्या बाह्य मौजेला भुलून जर आपण जन्मोत्सव करूं, तर आपणांस आपल्या स्वतःच्या जन्माचा तरी कसा वीट येईल ? जन्माचा जर वीट आला नाहीं तर मोक्षाकडे तरी आपली वृत्ती कशी वळेल ? आपण जन्मोत्सवाचें 'घी' तेवढें पाहतो. पण त्यामागें मरणाचा 'बडगा' आहे याची आपण कधीं तरी जाणीव ठेवतो कां ? आणि मग शेवटीं आपण जन्मसाफल्य काय केलें याचा विचार केला तर काय दिसेल ? "जन्मा आला हेला । पखाल वहातां मेला ॥" हेंच नाहीं कां ? मग आपलें हें वर्तन "तुम्हां सर्वां मिळो सायुज्यता । ऐसे वांछी मम मन ॥" (श्री. मा. दी. प्र. ३४–३९) ह्या बाबांच्या ध्येयास विपरीतच नाहीं कां ? आणि याची जाणीव करून देण्यासाठींच बाबांनी रामजन्माचे वेळीं नरसिंह अवतार धारण केला ! बाबा कोपले खरे, पण कसे ? तर "वरि वरि दाविसी मिणधा कोप । कोपोनि सांडविशी त्याचें पाप । शेखीं सायुज्याचे दीप । दाविशी सद्रूप दयाळुवा, ॥" (नाथ भागवत २–७५) विषयाभिलाष सोडणें महा कठीण आहे हें बाबांना अवगत असल्यामुळें त्यांचा कोप लटका—कारुण्यपूर्ण—असला तरी तो अनाठायीं नव्हता. त्यांत आपलें वर्तन मोक्षाला कसे विपरीत आहे याची जाणीव त्यांना आपल्याला करून द्यावयाची होती व ती त्यांनी दिली. त्यांचे कर्तव्य त्यांनीं केलें आतां त्याची जागृति ठेऊन आपला उद्धार करून घेणें आपलें आद्य कर्तव्य आहे. "आत्मैवह्यात्मनोबंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥" (भ० गी. ६–५)

याचा अर्थ असे उत्सव आपण करूं नयेत असा मुळींच नाहीं. तसा असता तर बाबांनी नरसिंह अवतार घेतला त्यावेळींच पाळणा मोडून उत्सवाची इतिश्री केली असती

पण त्यांनी तसें केले नाहीं तर उत्सवाची सांगता करून घेऊन तो अव्याहत चालू ठेवणेची व्यवस्थाही केली ! ही लक्षांत घेणेसारखी गोष्ट आहे. प्रत्येक जण जन्मतःच तल्लख बुद्धिचा नसतोः उलट बहुजन अध्यात्मदृष्टया जडबुद्धिच असतात. बुद्धिमालिन्य हा दोष जन्मोजन्मींच्या कर्मांचा आहेः आजकालचा किंवा या जन्मींचाच नाहीं. तेव्हां अशा जडबुद्धिंचा उपहास करणें केव्हांही इष्ट नाहीं. असे जडबुद्धि आहेत म्हणूनच शहाण्यांच्या शहाणपणाला वाव आहे. सुज्ञांनी आपली बुद्धि अशाच जडबुद्धांच्या उद्धारार्थ–त्यांच्या अजाणतेचा फायदा घेऊन त्यांची दिशाभूल करून त्यांना लुबाडण्या-साठीं नव्हे–खर्चिली पाहिजे ! ही गोष्ट त्यांच्यांत आपल्याविषयीं आपुलकी उत्पन्न केल्याशिवाय होणें नाहीं ! अशी आपुलकी त्यांच्यांत मिळून मिसळून वागण्यानेंच होते. ह्याकरितां असे उत्सव फार फायद्याचे ठरतात. कारण एक्तर अशा जडबुद्धांना ऐहिक मौजेची आवड असते, तीही त्यांची त्यांत पुरत असल्यामुळें ते उत्सवांत आस्थेनें भाग घेतातः व त्यांतच जर सुबुद्धांनीं अवधान राखले तर त्यांच्या जडबुद्धीला चेतना देण्याचेही काम सहजांत होतें आणि कालांतरानें त्यांची बुद्धि सहजांत सात्विक–शुद्ध–होऊं लागून ते आत्मोद्धाराच्या मार्गाला लागतात. म्हणजे मोठमोठ्या तत्त्वज्ञांना जो करूं म्हणून लोकसंग्रह करतां येत नाहीं तोच ह्या अशा उत्सवांनीं सहजांत होतो. म्हणूनच ज्ञानेश्वर–तुकारामांनीं वारकरी संप्रदाय स्थापिलाः त्याहिपूर्वीं द्वापारयुगीं श्रीकृष्णानें तो अनिर्बंध चालविला. सामान्यतः अज्ञ–मूढ–गणल्या जाणाऱ्या गोपी (स्त्रिया) व गोपाळ (मुलें) यांत मिळून मिसळून त्यानें त्यांना आपल्यांत समरस करून घेऊन आपलें ' गोकुळींचा चोर ' हें नांव सार्थ केले. तेथपासूनच ' गोपाळ काला ' सुरू झाला ! येथेंही ' झालें गोपाळ गुंडाचें मानस । यात्रा एक अथवा उरूस । भरवावा-॥' ६–४७ यांत गोपाळ गुंडाला प्रेरणा देऊन व ' नाहीं झाला गोपाळ काला । उत्सव सरला न म्हणावें ॥ ' ६–९२ अशी गोपाळकाल्यानें उत्सवाची सांगता करून हेंच उत्सवाचें महत्त्व बाबांनीं प्रत्यक्ष दाखविलें आहे व तसेंच स्वतः श्रीकृष्णाचा अवतार असल्याचा पुरावाही दिला आहे. या दिशेनें जर उत्सव साजरे केले जातील तर खरोखरीच ते लोकप्रिय व लोकोपकारक ठरतील ! !

' पंच वार्षिक कवठ्याची प्राप्ती एकाच उत्सवीं बाबा देती ॥ '

६.११७

बाळाबुवांना बिन्हाडसिद्ध कवठे गांवच्या उत्सवानिमित्त वार्षिक ३० तीस रुपयांचा तनखा होता. एकसाल मरगीमुळें तो गांव खालीं झाला व उत्सव राहिला. ती

मंत्री साधून बाळाबुवांनी शिरडीस येऊन उत्सव केला व बाबांनी १५० रोकडे रुपये देऊन त्यांची संभावना केली !

कां ? सर्वज्ञ बाबांना व्यवहार कळत नव्हता की काय ? जर कळत नव्हता तर ते सर्वज्ञ कसे व कळत होता तर त्यांनी एकदम पांचपट बिदागी देऊन कां टाकली ? ह्यांत बाबांनी हेंच दाखविलेलें दिसतें की, सगुण मूर्तिच्या सेवेपेक्षां सगुण सद्गुरूची सेवा अधिक ( पांचपट ) सुफलदायी ठरते ! कां ? निर्गुण मूर्तिपुढें कीर्तनकाराची तन्मयता होत नाहीं असें नाहीं: पण त्याच्याच जोडीला त्यांना ' अहं ब्रह्म ' चा भ्रम ( साक्षात्कार नव्हे ) होणेचा विशेष संभव असतो. तेथें कीर्तनकाराची भूमिका ' वासरांत लंगडी गाय शहाणी ' अशासारखी कांहींशी असते, व त्यामुळें ' आपण सर्ववेत्ता आपण सांगूं तें प्रमाण; व तें ऐकणारांनीं सर्वथैव मानलें पाहिजे ' असा अहंभाव तेथें उत्पन्न होणेची भीति फार असते. त्यांचे कारण असें की, कीर्तनकार झाले तरी बहुशः सारेच असतात. त्यांच्या वैषयिक वासना मेलेल्या नसतात. सर्वसाधारण श्रोतेही तसेंच असतात तेव्हां जर कीर्तनकार श्रोत्यांना रंजवील तरच ' अहोरूपं, अहो ध्वनि ' या न्यायानें त्याला भरपूर बिदागी मिळण्याची आशा: त्यांत आणखी ' कीर्तनकार ' या मानानें ते मोहित होतात. अशा स्थितींत सगुण मूर्तिची वचक त्यांच्यावर बसत नाहीं. त्यांचे अवधान सुटतेः विषय प्रतिपादण्यापेक्षां विषय-रंगविण्याकडेच त्यांचे लक्ष वेधते त्यामुळें कीर्तनाचा खरा उद्देश जो ' श्रोत्यांवक्त्याची प्रभुशीं तन्मयता ' तो दुरावतो. म्हणजे कीर्तनकाराला व श्रोत्यांना अध्यात्मिक प्राप्ती बेताचीच होते ! पण तेंच बाबां सारख्या अधिकारी व सर्वमान्य विभूतिंच्या दरबारांत कीर्तन करणेची पाळी आली की त्यांच्या ' मी '-पणाला अचूक खीळ पडते व श्रोतेही व्यवस्थित असतात. अतएव श्रोवक्ता सावधान असतातः शिवाय येथें बिदागी देणारे श्रोते नसतात. तर ती विभूति असते: तेव्हां त्या विभूतिला रुचेल असें कीर्तन रंगविणें त्यांना प्राप्त होतें ? यामुळें कीर्तन उद्बोधक होतेः श्रोत्यांना त्यांत सन्मार्ग मिळतोचः पण विशेषतः कीर्तनकारची वृत्ति प्रभुशीं तन्मय होऊन तो लवकर आत्मानुभव चाखतो. व अशा तऱ्हेनें अध्यात्मिक बिदागी भरपूर मिळते ! म्हणजे सद्गुरूच्या सान्निध्यांत श्रोत्यावक्त्यांच्या भावनात्मिक तन्मयता सत्वर होते हेंच श्रीबाबांनीं ह्यांत दाखविलें आहे.

' मशिदीचाही जीर्णोद्धार । व्हावा आपुलें हस्तें साचार ॥
भक्त गोपाळ गुंडांचा निर्धार । पाषाण तयार करविले ॥
' परि हा जीर्णोद्धार योग । नव्हता वाटे गुंडाचा भाग ॥

या विशिष्ट कार्याचा सुयोग । आला मनाजोग पुढावा ॥
' वाटे बाबांच्या होतें मनीं । करावें हें कार्य नानानीं ॥
फरसबंदी मागाहुनी । करावी काकांनीं तदनंतर ॥
' तैसेंच पुढें घडून आलें । आधीं आज्ञा मागतां थकलें ॥
म्हाळसा पतीस मध्यस्ती घातलें । अनुमोदन मिळलें बाबांहि ॥'

६–१२१ । ५

गोपाळ गुंड भक्त खरा पण त्याची भक्ति सांप्रदायिक–वारकरी–होती. तो ज्ञान मार्गाचा अधिकारी नव्हता आणि मशीद जर बाबांनीं ज्ञानमार्गाचें अधिष्ठान केलें होतें अर्थात् तिचा जीर्णोद्धार करण्याचा अधिकार त्याचा नव्हता; म्हणून तें कार्य बाबांनीं त्याच्या करवीं करून दिलें नाहीं. ज्ञानमार्गाची प्रतिष्ठा विवेक व साधक करूं शकतात. म्हणून बाबांनी नाना ( विवेक ) व काका (साधक) यांच्याकडूनच तें कार्य करविलें. पण बाबांना भक्तिमार्गच प्रिय असल्यामुळें त्या कार्याला अनुमोदन भक्तांतून–म्हाळसापति कडून–मिळविलें गेलें. नाना विवेक–ज्ञानमार्ग, काका साधक–कर्म मार्ग व म्हाळसापति–भक्त–भक्तिमार्ग, असें घेतलें तर मशिदींत सर्व एकवटतात ! म्हणजे ज्ञानदेव तुकैवल्यम् ' सर्व मार्गाचें पर्यवसान अखेर ज्ञानांतच होतें. ' सर्व कर्माखिलं पार्थ ज्ञानेपरिसमाप्यते ॥ भ. गी. ४–३३ हें भगवंताचें तत्वच यांत प्रतिपादलें आहे.

' असो जेव्हां मशीदीशीं । निशींतं एका झाली फारशी ॥
तेथून मग दुसरेच दिवशीं । बाबा गादीसीं बैसले ॥ '

६–१२६

मशिदीला फरशी झाली ! केव्हां ? एका निशींत ? एक जात मायेचा ( मायिक सूर्याचा ) अस्त झाल्यावर म्हणजेच एकजात वैराग्य पूर्णत्वानें बाणल्यावर ! येथें 'एका' शब्दानें एकत्वानें वा पूर्णत्वानें असा अर्थ अभिप्रेत आहे. ती कोणी केली तर ' विवेक व भक्तियुक्त साधकानें ' ! म्हणजे जेव्हां वैराग्य ( निशींत ) पूर्णत्वानें बाणतें. व विवेक ( नाना ) आणि भक्ति ( म्हाळसापति ) यांच्या साहाय्यानें साधक ( काका ) साधन करून ज्ञाननिष्ठ होतो–फरशी करतो–तेव्हांच दुसरा दिवस [ ज्ञान-रवि ] उगवतो त्याला आत्मज्ञान होतें ! आतांपावेतोंच्या ' निरीक्षणांत ' सूर्य किंवा दिवस हा प्रयो मायिक वैभवाला अनुलक्षून वापरलेला होता, म्हणून येथें ' दुसरा दिवस ' यांतील ' दुसरा ' शब्दानें ' विज्ञान–अपरोक्ष ज्ञान ' व्यक्त केलें आहे. असा हा ज्ञानर

उगवतो–त्याला आत्मसाक्षात्कार होतो तेव्हांच बाबा गादीशी बैसले ॥ म्हणजे त्याच्या हृदयासनी गादिशी परमात्मा बाबा अधिष्ठित होते. ( बैसले )–तो मुक्त होतो–

'अकरा साली सभामंडप । तोहि प्रचंड थाटाटोप ॥
केवढा तरी महाव्याप । जाहला थरकांप सकळिकां ॥ १२७
'भक्तांनी रात्रीचा करावा दिवस । खांब चिणावे करोनि सायास ॥
चावडीतून परतण्याचा अवकाश । लागावें उपटण्यास बाबांनी ॥' १३३

सभामंडप बांधावयाचा मनांत आणून साहित्य आणलें व बाबा चावडींत गेलेसें पाहून भक्त रात्रीचा दिवस करून काम चालू करीत. पण सकाळी चावडींतून परत येतांना बाबा तें उखडून टाकीत !

येथें लक्षांत घेण्यासारखी गोष्ट म्हणजे ह्या आख्यायिकेंत ( १२७ ते १३४ व पुढेंही ) सभामंडप बांधण्याकरितां बाबांचे अनुमोदन अगाऊ घेतल्याचा उल्लेख कोठेंच आढळत नाहीं ! तेव्हां माझ्या–परमेश्वराच्या–इच्छेशिवाय पानसुद्धां हालत नाहीं: ते तुम्ही माझ्यापरोक्ष ( दृष्टिआड ) सभामंडप घालूं पहातां: मग तें कसें सिद्ध होईल. जेथें पृथ्वीसुद्धां माझ्या आधारावर जळांत विरत नाहीं व प्रळयकाळीं मी तो आधार काढून घेतांच पृथ्वी विरून जलमय होते; तेथें माझ्या अनुमतिशिवाय मंडप तरी कसा होणार ? हेंच बाबांनी मंडप मोडण्यांत वरवर दाखविलेलें दिसतें.

पण आध्यात्मिक दृष्ट्या त्यांत आणखी प्रकाश पडतो. "सभामंडपांचे कार्य अनेक व्यक्तिची सभा भरविण्याचें ! हा अनेकत्वाचा भाव मायाच उत्पन्न करते: तेव्हां अनेकत्व भासविणें हे मायेचें कार्य आहे आणि बाबा–परमात्म्याचें कार्य काय ? तर अद्वैत प्रस्थापित करणें ! अर्थात जेथें द्वैतच नाहीं तेथें सभा तरी कसली व मग मंडप तरी कशाकरितां ? अशी तत्त्वतः वस्तुस्थिति असतां तुम्हीं स्वतःस माझे भक्त म्हणवितां, आणि मी तुमचे पाळणें ( जन्ममरण ) मोडण्याकरितां अवतार घेतला असतां, तुम्हीं रात्रीचा दिवस करावा–मायेलाच ब्रह्म म्हणून कवटाळावें व आपली सर्व शक्ति त्या मायेचेच दृढीकरण ( खांब चिणणें ) करण्यांतच खर्च करावी: हा कोणता न्याय ? भक्तिमार्गपासून हाच तुम्ही बोध घेतला काय ? भक्तिमार्गांत ( चावडीत ) मला शोधावयाचें सोडून तुम्ही भक्तिच्या नांवाखालीं मायेचाच डोलारा ( सभामंडप ) उभारण्यांत गर्क झालांत ! चावडीत ( भक्तिमार्गांत ) तुम्ही माझ्या शेजारी येऊन निजाल ( सायुज्यता मिळवाल ) अशी मी वाट पहातों तों तुम्हीं हा नसताच उपद्व्याप आरंभितां ! हे तुमचे मायेचे चोचले मला परवडणार नाहींत ! माझें ध्येय

तुमचे पाळणे मोडण्याचे आहे आणि तुमची कुनी मंडप बांधण्याची आहे. पण मी जसे तुमचे पाळणे (जन्ममरणाचे) मोडीन, तसाच मंडप (माया-जाल) ही उखडून काढीन !" हेंच श्रीबाबांनी यांत दाखविलें आहे.

पण जसा रामजन्मोत्सवाच्या समयीं बाबांनी पाळणा मोडण्याचा आव आणला, पण मोडला नाहीं तसाच येथें मंडप मोडला तरी पुनः बांधून दिला. पण केव्हां ? जेव्हां—

'तात्यावरी हा हल्ला । केला गिल्ला बाबांनी" १४८

तेव्हांच !

(कथासार :—१३४।१४५ ही मांडवाची मोड जोड चालू असतां एकदां बाबा अति कावले. त्यांनी एका हातानें मूळ पहा खांब हाल्हालवून ढिला करून उपटला. तो त्याच्या डोक्याचा फेटा काढून काडी लावून पेटवून खड्यांत टाकला व सोबत खिशांतून एक रुपया काढून तोही त्या खड्यांत टाकला. तात्या अगदीं घायाळ झाले. माधवराव, भागोजी आदि जे कोणी सोडवयास मधें पडलें त्यानांही बाबांनी यथेष्ट चोपलें मग बाबा शुद्धिवर आले. व एक जरी फेटा आणून तात्यांच्या डोक्याला बांधला व तेथून सभामंडप निर्विघ्न बांधला गेला.)

तात्या कोते यांची सूमिका यांत आपल्याला समजली कीं बाबांच्या सर्व इतांचा बोध सुगम होईल ! त्यांच्या भूमिकेचा मला त्यांच्या 'कोते' या आडनावांतच बोध होतो. व्यवहारांत 'कोता' म्हणजे तोकडा, अपूर्ण अशा अर्थानें तो शब्द आपण वापरतो. अध्यात्मांत अपूर्णत्व कशांत असतें ? तर मनांत ! 'मनएव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः ॥' म्हणून मी तात्या कोते यांना 'मना'ची भूमिका प्रस्तुत 'निरीक्षणां'त दिली आहे. व हीच भूमिका घेऊन प्रस्तुत कथेंत काय निघते तें पाहूं !

सभामंडप-मायेचा डोलारा-बांधण्याचें घाटत होतें पण परमात्म्याच्या अवतार-तारकार्याला तें विसंगत होते म्हणून बाबांनी त्यांत व्यत्यय आणला. आपण मायिक आहोंत ! मायेंत गुरफटलेलों आहोंत ! अगदी मायामय आहोंत ! मग मायेंत रहाणारा मायेचा बाजार कसा मांडणार ? मायेनेंच तर त्याचा अक्षरशः बाजार मांडला आहे ! तेव्हां आपल्याला जर मायेचा बाजार मांडावयाचा असेल तर प्रथम आपण मायापार झालें पाहिजे. मायेंत जें आपण बांधले गेलों तें कशामुळें ? तर मनानें ! तेव्हां मायापार व्हावयाचें तर प्रथम मन मारलें पाहिजे ! मन 'न-मन' कसें करावयाचें ? तर लीनतेनें व निरहंकार वृत्तिनें !

व्यवहारांत ताठ मान करून चालणें व फेटा बांधणें ही सन्मानदर्शक असतात; म्हणूनच पर्यायानें तीं अहंकाराची ( मान्यतेची ) चिन्हें ठरतात. पण जोपर्यंत ही अहं-वृत्ति आहे तोपर्यंत मन मेलें असें होत नाही; जेव्हां अहंकाराचें आमूलाग्र निरसन होते तेव्हांच मन मरतें. बाबांनी तात्या पाटलाची मान पकडून त्याच्या अहंकारालाच हात घातला व त्यांचे समूळ निर्दाळण फेटा काढून जाळून केलें. व अशा रितीनें मनाला—तात्याला—मारलें; मन हेंच मायेचे अधिष्ठान: मन मेलें—नमन झालें—की माया हीली पडते; हें बाबांनीं खांद हालवून ढीला करून दाखविलें. की लगेच परमात्म्याशीं एक रूपता होते; 'लगेच खिशांत हस्त घातला। रुपया एक बाहेर काढिला। तोहि तेथेंच निक्षेपला। जणों तो केला सुमुहूर्त' ॥ १३७

मन मारणें मोठें कठीण काम आहे! भक्ति, विवेक, विचार इत्यादि साधनें जरी साधकाला आत्मोन्मुख बनवितात तरी मन मारण्यास तीं निष्फळ ठरतात कारण भक्ति म्हटली की दया—शांति आली: मन मारतांना आपण मनावर दया—शांति दाखविली की मन मोकाट सुटून आपल्याच बोकांडी बसेल; विवेक किंवा विचार म्हटला की तेथें कोणाल्याेह दुखविणें, मारणें हें असत्—पाप—ठरणार. पण म्हणून आपण मनाला न दुखविलें तर तें आपल्याला दु:खाच्या गर्तेत लोटल्याखेरीज रहाणार नाहीं तेव्हां दया, क्षमा, शांति इ. सर्व सात्विक साधनें आपल्याला इतरत्र अध्यात्मांत उपकारक असली तरी मनाच्या बाबतीत तीं अपकारकारक आहेत. व म्हणूनच व्यवहारांत सुद्धां त्यांचा उपयोग तारतम्य भावानें करावा लागतो; व त्याकरितांच गीतेंत भगवंतांनीं त्यांचे सात्विक,राजस व तामस असे त्रिविध भेद केले आहेत.

पण हे त्रिविध भेद जाणून तारतम्य भावानें त्यांचा विनियोग करण्याकरितां प्रथम आपण त्रिगुणातीत झालें पाहिजे त्रिगुणांत किंवा त्यापैकीं एका गुणांत राहून आपल्याला कधींही त्रिगुणांची यथा—न्याय पारख करतां यावयाची नाही. व त्रिगुणात्मक मन मारल्याखेरीज आपण त्रिगुणातीत होणार नाहीं. म्हणून मन मारणें हें आद्य कर्तव्य आहे. तेथें निष्ठुरच बनलें पाहिजे. त्यांत भक्ति विचार यांची मध्यस्ती कामा येत नाहीं. व म्हणूनच माधवराव [ विचार ] भागोजी ( सेवक ) इ. तात्या कोत्यांना ( मनाला ) मारतांना, 'जे जे मध्यस्ती करावया गेले त्यांना वेळींच अनुग्रहीले ( येथेष्ट धुमसिले ) बाबांहि ॥ १४१ अशा मन रितीनें मारलें की तो जीवनमुक्त होतो त्रिगुणातीत होतो. तो पुरुषोत्तम होतो. व हाच पुरुषोत्तमाचा मान बाबांनी तात्यांना मारल्यानंतर आधीं नव्हे यांना दिला! 'तात्काळ दुकानदार बोलाविला। जरी काठी फेटा आणाविला। स्वयें

तात्याचे डोक्यास बांधीला । शिरपाव दिधला जणु त्यास ॥ १४३' तात्या पुरुषो-त्तम झाले: त्रिगुणातीत झाले: मायापार झाले ! म्हणजे आतां त्यांना ' मायेचा डोलारा ' सभामंडप बांधण्याचा अधिकार आला व त्याप्रमाणें पुढें बाबांनी सभामंडपाच्या कामांत व्यत्यय आणला नाही.

हा सभामंडप केव्हां झाला तर "अकरा साली सभामंडप" । १२·७ मन मेलें-परमात्म्यांत विलीन झाले, की बाकी पांच ज्ञानेंद्रियें व पांच कर्मेंद्रियें हीही तत्स्वरूप होतात ! अशा दहा इंद्रियें व मन या अकरांचा परमात्म्यांत लय करून घेणें हीच खरी एकादशी ! व ' अकरा ' साली सभामंडप बांधण्यांत बाबांनी हीच एकादशी व्यक्त केली आहे. व त्यामुळें स्वतः भागवत सांप्रदायी असल्याचें दाखविलें आहे.

सारांश, प्रस्तुत अध्यायांत श्रीसाई भगवानानें भागवत सांप्रदायाचेच मंथन करून त्यांतील नवनीत ' एकादशी ' च्या रूपानें शेवटीं आपणांस दिलें त्याच्या निरंतर स्मर, णासाठी आपण आतां ' एकादशी ' वरील दोन गोडशीं पदें म्हणून गुरु-पदीं शिर ठेऊं व न-मन करूं !

पद—१

' एकादशेंद्रियां साक्ष मीचि । हीच एकादशी ॥ धृ ॥
नाहीं विषय-विषयीं भेद । साक्षि दे करसीं ॥ १ ॥
भोक्ता, भोग्य, भोगचि मीहि । सदानंद राशीं ॥ २ ॥
बाळा अवधूत द्वादशी माझी । दत्त चिदाकाशी ॥ ३ ॥

पद—२

' झाली एकादशी । रसतो सहज चिद्विलासी ॥ धृ ॥
भोग्यचि नाहीं, भोक्ता कैंचा । नित्य उपवासी ॥ १ ॥
माझा मीचि सर्वांठायी । सहज उदासी ॥ २ ॥
बाल-मुकुंद धन्य सद्गुरु । दत्त हृदयवासी ॥ ३ ॥

( श्रीपंत महाराजाकृत ' दत्त प्रेम लहरी ' )

॥ इति षष्ठाध्याय निरीक्षणम् ॥

॥ श्रीसद्गुरु चरणार्पण मस्तु ॥

# शिर्डीवृत्त

## डिसेंबर १९४०

या महिन्यांत श्रींचे दर्शनास मद्रदेशीय भक्तांचा फारच मोठा ओघ नाताळच सुटीत येऊन गेला. महाराष्ट्रीय भक्त गणही आले होते. एकंदर आलेले भक्तांची गाववार यादी प्रामुख्यानें पुढील प्रमाणे आहे. मुंबई अहमदनगर, तिन्नानूर, सोलापूर, अरुणाचल औरंगाबाद, बंगलोर, माटुंगा, नेल्लोर, वेल्लोर, बेल्लारी, बांद्रे, करनूल, प्रोद्त्तर, अनंतापूर, धर्मवरम, करूर, दादर, इरोड, सांताक्रुझ, करनूल वेत्रपागडा, चिट्टूगूटा, मद्रास, व अंधेरी.

श्रीयुत बी. व्ही. एन.. स्वामी हे येथें हजर होते व त्यानी मद्रदेशीय भक्तांची विचारपूस करून शिरडीतील सर्व स्थलांची माहिती त्या भक्तवृंदांस करून दिली व एक दिवस श्रींचे मंदिरांत त्यानीं त्यांचे भाषेत श्रीसाईबाबांचे चरित्रावर प्रवचन केले.

मद्रदेशीय कांही सन्माननीय भक्तांनीं आपली मतें शेरेबुकांत नोंदली आहेत त्या-पैकीं कांही नमुन्याकरितां म्हणून सोबत दिली आहेत.

## देणग्या

आलेले भक्तांकडुन कोठी, कायमफंड वगैरे संस्थानचे फंडास आर्थिक देणग्या आलेल्या पावत्यावरहुकूम जमा आहेत. जरीकाठी बनारसी शेला, खादीशाल व वायाळ छापड दिवे व काठ तांबडे अशा कांही वस्तूही देणगी रूपानें आल्या आहेत.

## धर्मकृत्यें

एकंदर ६६ अभिषेक, एक लघुरुद्र, तीन विष्णु अर्चने व एक अन्नदान या महिन्यांत संस्थान मार्फत भक्तांचे इच्छेनुरूप करणेंत आली. शिवाय नानाळच्या गुढीन भक्तांचे लघुरुद्र, अभिषेक, अर्चने व नैवेद्य वगैरे बरेच झाले.

## किर्तनें

संस्थान मवयाची ३ कीर्तने या महिन्यांत झाली.

## उत्सव

श्री. दत्तजयंती उत्सव कै. नवलकर वाड्यांत दरसाल प्रमाणे थाटानें संस्थानचे स्थानिक विश्वस्त श्री. तात्याजी गणपतराव पाटील कोते यांचे देखरेखी खालीं व श्री. सगुण मेरु नाईक यांचे मेहनतीनें मोठे उत्साहानें साजरा करणेंत आला.

## स्थानिकवृत्त

संस्थान लायब्ररीचे बाबतींत गेले अंकी विशिष्ट वर्गास कमिटीचा निर्णय होईपर्यंत निर्बंध घातलेला दूर करणेंत आलेला आहे. या बाबतींत उभयपक्षी ( संस्थान नोकर व मास्तर वर्ग ) समेट झाला असलेची शुभ वार्ता संस्थानकडे आलेले लेखी पत्रांवरून ध्वनीत होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे व मूळ प्रकरणाची कमिटीकडून पूर्ण चौकशी होऊन रीतसर शहानिशय लावणेची जरुरी नाहीं असें बंधुत्वाचे नातें प्रस्थापित करून पुढील कमिटीचे सभेपर्यंत कमिटीचे निदर्शनास आणून देणेचे श्रेय उभयपक्षांकडून घेणेंत येणेंत कसूर होणार नाही अशी उमेद आहे.

हवा पाणी उत्तम असोन थंडी बरीच पडत आहे.

श्री. ना. खारकर<br>
ऑ. चिटणीस

Opinions of the visitors to the shrine of Shri Sai Baba of Shirdi ( copied form the visitors remarks book )

1

I have the fortune to have Darshana of Shri Sai Baba and I have no words to express how joyful to be here in

person. All the arrangements were made here on excellent style. Swamigi was kind enough to take all of us to places of interest and we really felt very fortunate as Swamiji was here at a time when we came.

( sd ) R. Krishnamurty.

Dated 24/12/40. Cooperative Senior Inspector Bellary.

2

I with a family of six members had the fortune of coming here yesterday in time for the puja of Shri Saj Baba. We are all well looked after and the Pujas performed are really full of devotion. We feel the presence of Sri Baba with us here and are blessed by him. Our thanks to the devoteful staff working enthusiastically for the comforts and convenient worship by all Sri Babas Bhaktas.

( sd ) P. Krishnamurty B.A.

Inspector Hindu Religions Endowments

Cuddapah

Dated 26-12-40

3

I and my wife have the previlige of coming over to Shirdi along with Shri Cunniah Chetty ( Millowner ) family and had the blessings of Shri Saibaba. We found the institution very satisfactory. Arrangements for visitors found satisfactory. Every thing was impressive.

( sd. ) Sanku Chengalraya Chetty.

Municipal Councillor Nellore

Dated 27-12-40

श्री. रा. वा. घैसास

यांसी.

कळविण्यास अत्यंत वाईट वाटते कीं माझे परमपूज्य वडील ति. प्रो. गणपतराव नरके हे ता. ३०–१२–१९४० रोजी दुपारी ३ वाजतां नागपूर येथें अर्धांग वायूच्या पहिल्या झटक्या मध्येच साईचरणी लीन झाले. ते बनारस येथे Indian science Congress करता जाण्यास निघाले होते परंतु त्याचे पूर्वी ते नागपूर येथे कांहीं दिवस राहून नंतर जाणार होते. मध्येच बाबांची त्यांना आज्ञा झाली. माझे मामा श्रीमंत के. गो. बुटी यांचेकडे होते.

वा. ग. नरके

---

कळविण्यास अत्यंत वाईट वाटतें कीं, श्री. साईबाबांचे वयोवृद्ध भक्त सोमवंशीय क्षत्रिय कासार ज्ञातींतील सुप्रसिद्ध भांड्याचे व्यापारी कै० दामोदर सावळाराम शेट राशने हे ता. २०–१–४१ रोजीं पुणे मुक्कामी श्रीसाईबाबांचे चरणी लीन झाले. केसरी ता० २४–१–४१

---

श्री. संपादक " श्री साईलीला " मासिक यांस कृ. सा. न. वि. वि.

रा. रा. यशवंत जनार्दन गाळवणकर, शिरडी संस्थानचे एक विश्वस्त हे आपले ता. २६–१२–४० चे पत्रानें सं. चिटणीस यांस बाबांचे भक्तवर्य कै. ह. सी. दिक्षीत ऊर्फ भाऊसाहेब दिक्षीत यांचे वडील चिरंजीव बाबूराव हे बुधवार ता. १९ डिसेंबर १९४० रोजी आकस्मिक आपले राहते घरीं विलेपार्ले येथें कालवश झालेची दुःखद वार्ता साईभक्तांचे माहितीकरितां प्रसिद्ध करणेविषयीं कळवितात. या भाऊसाहेबांचे वडील चिरंजिवांचे अकाली निधनामुळें त्या कुटुंबावर ओढवलेले या आपत्तीबद्दल एकंदर साईभक्तांत दुःखोद्गार निघतीलच व ते प्रभू इच्छा बलवत्तर या सृष्टी नियमाकडे लक्ष देऊन आलेल्या प्रसंगास तोंड देऊन भाऊसाहेबांचे कुटुंबीयांस त्यांचे दुःखद प्रसंगाचे वाटेकरी असलेचे कळऊन त्यांचे शांतवन करणेंचे करतीलच.

आपला नम्र,

ठाणें, ता. २-१-४१.

श्री. ना. खारकर

ऑ. चिटणीस.

---

# अनुभव

डॉ. एम. के. राजगोपालचारी, नेलोर यांनी गेले श्रीचे पुण्यतिथी उत्सवासाठीं शिरडींत हजर असले वेळीं संस्थान चिटणीस रा. खारकर यांस समक्ष निवेदन केलेला त्यांचा अनुभवः

## ( बाबांचे आपले घरीं आगमन. )

आपणांस कोणीतरी श्री साईबाबांचा फोटो प्रथम सुमारें ५–६ महिन्यापूर्वी दिला. तो आपण आपले कंपाउंडरजवळ देऊन फ्रेम करून घेऊन आपले घरांत इतर फोटो होते त्यांत कोठे तरी लावणेस सांगितला. या मुदतींत नेलोर गांवीं बाबाबद्दल बोलवाला चालू होता. आपण स्वतः मात्र बाबा कोण काय वगैरेची विशेष चौकशी करणेकडे लक्ष दिलेले नव्हतें.

## ( आकर्षणास सुरवात पण स्वतःस जाणीव नाहीं )

कांहीं दिवसांनीं एके दिवशीं पहाटे ३ वाजतां आपले झोपणेचें खोलींत पलंगावर आपण झोपेंत असतां एक धिप्पाड स्वच्छ पांढरी कफनी व डोकीस पांढरेच फडके गुंडाळलेली व्यक्ती आपले खोलीचे दार उघडून आपले पलंगाजवळ येत असलेली व आपलेकडे निरखून पहात असलेली दिसली व ही मूर्ती जवळ येऊं लागतांच आपण जागें होऊन तिजकडे पाहूं लागतां असें दिसून आले कीं त्या व्यक्तीचें दोन्ही पोटऱ्या पासून पायाचे भागांतून पू व लस वाहत आहे. व ती मूर्ती जशजशी पलंगा-जवळ येऊं लागली तशी आपले खोलींतील संगमरवरी फरशी तिचे पायांतील वाहात असलेले रक्त व पू यानें खराब होईल याच भावनेने आपण एकदम उठून बसून उशाची

टॉर्च घेऊं लागलो तोंच ती व्यक्ती आले वाटेनें खोलींतून निघून गेली व आपण मात्र त्या व्यक्तीचे निघून जाणेकडे लक्ष न देतां पलंगाजवळपास आपणांस वाटले प्रमाणें कांहीं घाण पडलेली आहे किंवा काय हेंच पाहूं लागलो. तशी घाण वगैरे पडलेली न दिसून आल्यामुळें खोली बाहेर इकडे तिकडे थोडे निरीक्षण करून पुन्हां पलंगावर येऊन पडून झाले प्रकाराचा विचार करूं लागलो. त्याकरच पुन्हां झोंप लागून प्रातःकाळीं नियमीत वेळीं उठून घडलेले प्रकाराची पूर्ण विस्मृती होऊन रोजचे प्रमाणें व्यवसायांत गर्क झालों. ते दिवशीं आतां मात्र स्मरतें कीं मनास एक तऱ्हेची ओढ लागली असोन मन अस्वस्थ होतें. रोजचें प्रमाणें दोन प्रहरचे घरी येणेस वेळ होऊन घरी कुटुंब जेवणाकरितां वाट पहात असलेचें दिसोन आलें. जेवणास बसले असतां आज आपण कसले काळजींत आहां ? तोंड असें उतरलेले कां ? वगैरे पत्नीनें केलेले प्रश्नास कांहीं नाहीं वगैरे औपचारिक उत्तरें दिलीं, परंतु पत्नीचे मात्र समाधान नसलेचे आढळून आलें. असो. पुढें सायंकाळचे डिसपेन्स-रींत जाणेस निघालों असतां एकाएकीं बाबांचा फ्रेम करून कंपाउंडरनें लावून ठेवलेले फोटोकडे आचानक नजर गेली व त्या फोटोंतील पायापासून खालील भागास वाळवी लागलेचे दिसलेमुळें कंपाउंडर यास हाक मारून लावलेला फोटो काढून साफ करून माउंट नवा घालून घेणेस व एकंदर फोटोची साफसफाई बघणेस बजाविलें. आश्चर्याची गोष्ट ही कीं या वेळीं रात्री घडलेले प्रकारचा या फोटोस पायाकडील भागास लागले वाळवीशी कांहीं संबंध असलेचे मनांतही आलें नाहीं. इतकी या बाबतींत आपली विचारबुद्धी बथ्थड होती व बाबांचे पहिले आकर्षणाचा मज हतभाग्यावर मुळींच परिणाम झाला नाहीं, असो.

## बाबांचें आकर्षणाची जाणीव.

पुढें दोनतीन दिवसांनी दुपारचें चहाचे वेळीं पत्नी सांगूं लागली कीं, शेजारची आपणांस तिचें मुलांस पाहून जाणेस बोलावणेस आली आहे, या बाईचा लहान मुलगा अत्यावस्थ असोन दोन एमिनेंट डॉक्टरांचें उपचार चालू असलेचे व त्या उभयतां डॉक्टरांनी केस होपलेस असलेंचे डिक्लेर केलेचे आपणांस माहीत होते अशा परिस्थितींत आपण काय शास्त्र करणार म्हणून त्या बाईस सांगणेस मीं आपलें पत्नीस सांगूं लागलों. परंतु त्या बाईनें इतकी गळ घातला कीं आपले पत्नीचे आग्रहावरून आपणांस कपडे वगैरे न करितां तसेच त्या मुलांस बघणेस जावे लागलें. जाऊन केस होपलेस आहे. मूळ रात्र काढणार नाहीं. असें जरी दिसोन आलें तरी त्या बाईची

समजूत करणेकरितां सुचेल तें इंजेक्शन देणेचें ठरऊन घरून बॅग घेऊन परत गेलों व इंजेक्शनची तयारी केली. ते वेळीं मुलाची आई पुढें होऊन एक लहान पुडी पुढें करून म्हणू लागली कीं प्रथम या पुडीतील विभुती तुम्ही आपले हातानें मुलांस लावा व नंतर इंजेक्शन द्या. आपण विचारलें ही विभुती कसली व तुम्हीच पाहिजे तर लावा. तेव्हां ती बाई म्हणाली डॉक्टर ही विभुती 'साईबाबांची उदी' आहे ती तुम्हीच आपले हातानें प्रथम लावा व नंतर उपाय करा. मला बाईचे भोळेपणाचे व एकंदर आग्रहाचें आश्चर्य वाटलें. परंतु नाइलाज म्हणून तिचे म्हणणेंप्रमाणें करणे भाग पडलें. असो दुसरें दिवशीं उजेडतांच ती बाई आपले पतीस घेऊन सांगूं लागली की मूल अगदीं बरें झालें आहे व डॉक्टरांस जरूर जरूर घरी येऊन पहाणेस सांगा. पत्नीनें हें आपणांस सांगतांच आपण म्हणालों मूल रात्र काढणें शक्य नव्हतें. तूं मला काय सांगत आहेस कीं मूल बरें झालें आहे. परंतु बाई समक्ष पुढें येऊन सांगूं लागली व घरी येऊन जाणेचा आग्रह करूं लागली. तसेच आपण व आपली पत्नी बाईबरोबरच बाईकडे गेलों तों काय पाहिलें ! मूल आनंदानें खेळत आहे व अगोदर इतके मरणोन्मुख आजारी होतो असें म्हणणें कोणीही खरें मानणार नाहीं. झालें. या दृष्यानें आपलें वय्यड विचार बुद्धिपटल दूर होऊन एकदम प्रकाश पडला व स्वप्नांत पाहिलेले विभुतीचे तें दृश्य, फोटोस लागलेली वाळवी, मुलाचे आईने आपणांस बजाऊन आपलेच हातून बाबाची उदी मुलास लावविणे, वगैरे एकंदर गोष्टींचे काहूर डोक्यांत उठोन बाबा कोण, कसे होते, वगैरेची माहीती मिळविणेची आतुरता उत्पन्न होऊन माहिती मिळतां बाबांनी आपणांस आकर्षक करणेची कशीकशी योजना केली वगैरेचे कौतुक व आश्चर्य वाटून आपण बाबांचे कसे व किती भक्त बनलो हे नेलोर येथील या बाबांचे पुण्यतिथी उत्सवा प्रीत्यर्थ "लक्षार्चन" होत आहे व ज्याची जाहीरात श्री साईलीला अंक १० आजच प्रसिद्ध झाला आहे त्यांत दिलेली आहे त्यांत दिलेली आहे तीवरून व जरी त्या समारंभ कमिटींत आपण आहों तरी व डॉक्टर सारखे धंदाची निकडीची कामें बाबांचे यशावर सोंपवून आजचे त्या पुण्यपुरुषाचे पुण्यतिथी उत्सवास आपण सदेह इतके लांबचे पल्ल्यावर शिरडी येथें श्रींचे समाधी दर्शनास हजर आहो यावरून होईलच असें सांगितलें.

श्री. ना. खारकर
ऑ. चिटणीस

॥ श्री साईबाबा ॥

# शके १८६२ ते १८६४ पर्यंत शिर्डी संस्थान कमिटीच्या त्रैवार्षिक निवडणुकीकरितां

## श्री साईबाबा शिर्डी संस्थानच्या भक्तमंडळाच्या सभासदांची यादी

## शके १८६१.

---

### आश्रयदाते.

१ श्री. करंदीकर, रामकृष्ण जनार्दन.
२ ,, खत्री, शेट भुसाहाजी अली.
३ ,, ठक्कर, विठ्ठलदास माधवजी.
४ ,, तांबे, श्रीराम सदाशिव.
५ ,, दवे, मगनलाल नथुराम.
*६ श्री. बुटी, केशवराव गोपाळ.
७ ,, बुटी, पूर्णचंद गोपाळ.
८ ,, मोतीलाल माणिकचंद (उर्फ प्रतापशेट.)
९ ,, सावंत, नागेश आत्माराम.

### सन्मान्य सभासद.

१ श्री. ह. भ. प. सहस्रबुद्धे, गणेश दत्तात्रय उर्फ दासगणू महाराज.
२ श्री. स्वामी, बी. व्ही. एन..

### तहहयात सभासद.

१ श्री. श्रीयान, गोपाळ गणेश.
२ सौ. अम्मल, व्यंकट लक्ष्मी.
३ सौ. अमाल, राजलक्ष्मी.
४ श्री. आयर, व्ही. स्वामीनाथ
५ ,, आराळकर आत्माराम लाडोबा
६ श्रीमती ओझरकर, पार्वतीबाई.
७ श्री. कर्णिक, शंकर सिताराम.
८ श्री. करंदीकर, केशव महादेव.
९ ,, करंदीकर, मधुसूदन जनार्दन.
१० श्रीमती कातुलकर, दुर्गाबाई.
११ ,, कामत, रमाबाई.
१२ श्री. कोठारी, जिवनराव बाळकृष्ण.
१३ ,, कोठारे, गणपतराव मोरेश्वर.
१४ श्रीमती कोठारे, फीरोजबाई रामराव.

१५ श्री. केंडक, शामराव भास्कर.
१६ ,, कुंभार, आनंदजी हिरजी.
१७ सेक्रेटरी. कर्णी भमेन्यूधर नाटक क्लब.
१८ श्री. खारकर, श्रीधर नारायण [12]
"ट्रू" *१९ रा. सा. गाळवणकर, यशवंत जनार्दन.
२० श्रीमती घटे, जनाबाई सिताराम.
*२१ श्री. घैसास, रामचंद्र वासुदेव,[2]
२२ डॉ. कॅप्टन, चांदोरकर बी. आर.
२३ श्री. चांदोरकर, वासुदेव नारायण.
२४ सौ० चेट्टी, बी. पी. कुटी आम्मा.
२५ रा. सा. चेट्टी, सि. सुब्रिया.
२६ श्री. चौधळ, मा. वि.
२७ ,, ठक्कर, माधवजी झीणा.
"ट्रू" *२८ ,, देव, बाळकृष्ण विश्वनाथ,[12]
२९ सौ० देव, जानकीबाई बाळकृष्ण.
३० श्री. देव, श्रीपाद बाळकृष्ण.
३१ सौ० देव, उमाबाई श्रीपाद.
३२ श्री. देव, श्रीनिवास बाळकृष्ण
३३ ,, देव, विष्णु गोविंद.
३४ डॉ. देसाई, जी. पी.
३५ श्री. नवलकर, सुंदरराव दिनानाथ.
३६ सौ. नवलकर, शांताबाई सुंदरराव.
३७ सौ. नार्वेकर, श्रीमतीबाई.
३८ श्री. परांजपे, विष्णु बाळकृष्ण.
३९ ,, परेरा, जाव अंतोन.
४० ,, पाटणकर, गजानन शिवराम.
४१ ,, पाटणकर, रामचंद्र वामन.
४२ ,, पाटील, त्रिंबक गोविंद.
*४३ ,, पुरंदरे, रघुवीर भास्कर.[11]
"ट्रू" *रा. ब. प्रधान, मोरेश्वर विश्वनाथ.[1]
४५ श्री. बापट, दामोदर रामकृष्ण.
४६ ,, वाड, गो. वि.
४७ ,, शितोळे, आनंदराव गणपत.
४८ ,, शिरोडकर, सावळाराम आत्माराम.[*]
४९ ,, शेट, कृष्णलाल मनोरदास.
५० ,, शेट, जमनादास हरकचंद.
५१ ,, शेट, लाला लखमीचंद
५२ ,, शेट, रजबअल्ली महंमद.
५३ ,, सातघरे, चिंतामण रामनाथ.
५४ डॉ. सावे, केसरीनाथ वासुदेव.
५५ श्री. सावे, मोरेश्वर नारायण.
५६ ,, साटम, भास्कर सदाशिव.
*५७ ,, सांवारे, दाजी विठ्ठल.
५८ सौ. सुभम्मा, पी.
५९ मेसर्स संजीवापा आणि सन्स.
६० डॉ. कॅप्टन हाटे, व्ही. जी.

## सामान्य सभासद.

१ श्री. अदीया, त्रिभुवन नरोत्तम.
२ ,, अदीया, नरेंद्र त्रिभुवन.
३ ,, अदीया, भगवंत त्रिभुवन.
४ ,, औंटो, केशव तात्या.
५ ,, शेट ईराणी, आरदेसर नामदार.
६ ,, ईजिनकर, पुरुषोत्तम बाळकृष्ण
७ ,, कर्णिक, बळवंत हरी.
८ ,, करकेरिया, जे. पी.
९ ,, काजळे, नारायण गोविंद.
१० ,, कापडीया, त्रिकमदास पी.
११ ,, केसकर, वामन सांबाशेट.
१२ ,, डॉ. कैकिणी, श्रीपाद शांतमूर्ति.
"ट्रू" *१३ श्री. कोते पाटील, तात्या ग.[10]
१४ ,, कोनकर, गणेश अनंत
१५ ,, कोहोजकर, शंकर बळवंत.

१६ श्रीमती कोल्हाळ, सुभद्राबाई.
१७ श्री. खोत, गो. वि.
१८ डॉ. गंगाधरन, एन.
१९ सौ० गाडगीळ, लक्ष्मीबाई गोविंद.
*२० श्री. गाडगीळ, गोविंद काशिनाथ.।।
२१ सौ० गोरक्षकर, सुशिलाबाई वसंतराव.
'ट्रू' २२ श्री. गोरक्षकर, वसंतराव नारायण.
२३ कु. गोरक्षकर, ताराबाई नारायण.
२४ श्री. घडियाळी, पुरुषोत्तमदास गोपाळ.
२५ ,, घाटे, नरहर रामचंद्र.
२६ ,, चैसास, विनायक रामचंद्र.
२७ सौ. चित्रे, गोपिकाबाई. अनंतराव
२८ श्री. चित्रे, अनंतराव वि.
२९ रावबहादुर चितळे, गणेश कृष्ण.
३० श्री. चेट्टी, एन्. रामकृष्ण
३१ ,, चेट्टी, बी. पी.
३२ श्री. चेट्टी. नाथाराम, कृष्ण
३३ ,, जोशी, दा. गो.
३४ ,, ठाकोर, एम्. एम्.
३५ ,, ठोकळ, ल. स.
३६ सौ. तर्खड, ताराबाई
३७ श्री. शेट ताडिवाला, डोरावजी ध.
३८ कु. तेंडुलकर, इंदिराबाई
३९ श्री. द्वारकानाथ आणि कंपनी
४० ,, दिघे, रामकृष्ण जी.
४१ ,, देसाई, जनार्दन आत्माराम
४२ ,, देसाई, भिमराव, टी.
४३ सौ. धुरु, वत्सलाबाई
४४ श्री. धुरु, जी. आर.
४५ सौ. नाडकर, सोनाबाई ल.
४६ श्री. नांचणे, शांताराम बळवंत.

४७ श्री. नाडकर्णी, गो. वि.
४८ ,, एस्. नारायणमूर्ती.
४९ डॉ. नायडू, सुब्रह्मण्यम.
५० ,, परिमल , सुब्रह्मण्यम्.
५१ ,, प्रधान, प्रभाकर जी.
५२ ,, प्रधान, दत्तात्रय बळवंत.
५३ ,, प्रधान, जी. व्ही.
५४ ,, पटेल, वा. प्रा.
५५ ,, पाटील, गोविंद नामाजी.
५६ ,, पाटील, काशा सखाराम.
५७ ,, पाटणकर, दत्तात्रय नारायण
५८ श्रीमती फणसे, पार्वतीबाई शिवराम
५९ श्री. बेलापूरकरीण, ताराबाई.
६० ,, बारवकर, बापूराव रा.
६१ डॉ. भट, छोटालाल भुलाभाई.
६२ श्री. भिडे, का. ल.
६३ ,, मैत्री, बाळकृष्ण जयराम.
६४ ,, मदनजी भिमजी.
६५ सौ. मारवाडी, जिवनबाई पु.
६६ श्री. मालवणकर, चंद्रकांत बाळकृष्ण.
६७ ,, मांडे, रघुनाथ सखाराम.
६८ ,, मुल्की, ए. आर.
६९ ,, रत्नपारखी, धोंडो म.
७० ,, राजा, डि. एम्.
७१ सौ. राऊतबाई, बाळकृष्ण.
७२ सौ. राजलक्ष्मी, अम्मल
७३ श्री. राधाकृष्ण, द्वारकादास
७४ ,, रामुलू, बसीरेडी.
*७५ ,, रासने, द. दा.।
७६ ,, रेडी, टी. वल्लभगिरी,
७७ ,, लिंगम, टी. एस. ए.

७८ सौ. वाक्कर, वत्सलाबाई
७९ ,, वाक्कर, जयराम पांडुरंग
८० विश्वनाथन, पी. एन.
८१ श्री. व्यंकटरामन, बी. एस.
८२ सौ. वेलिणकर, माणिकबाई वा.
८३ श्री. वैद्य, विनायक अप्पाजी.
८४ ,, वैद्य, दत्तात्रय गणेश.
८५ ,, वेनूगोपाळ, चारी.
८६ ,, शिरोडकर, वा. सावळाराम.
८७ ,, शेळके, ठमाजी भिकाजी.
८८ श्री. शंकरलाल जेठालाल.
८९ ,, सबनीस, द. मो.
*९० ,, सहस्त्रबुद्धे, म. वि.[9]
९१ ,, साळसकर, व्ही. जी.
*९२ ,, सामंत, रामचंद्र रामकृष्ण.[10]
९३ ,, सामंत, रघुनाथ रामचंद्र.
९४ ,, सामंत, वासुदेव सिताराम.
९५ ,, सांड्र, वासुदेव कृष्ण.
९६ सौ. डुबे, इंदीराबाई.

## चालू शिर्डी संस्थान कमिटी.

### ५ ट्रस्टी

१ रा. बा. मो. वि. प्रधान.
२ रा. रा. तात्याबा गणपतराव पाटील कोते.
३ ,, ,, बाळकृष्ण विश्वनाथ देव.
४ ,, ,, वसंतराव ना. गोरक्षकर.
५ रा. सा. यशवंतराव ज. गाळवणकर.

### १० सभासद.

१ ह. भ. प. दासगणू महाराज ( अध्यक्ष ).
२ रा. रा. श्रीधर नारायण खारकर,
( चिटणीस व स्वतःचे काम संभाळून खजिनदार ता. १७।४।४० पासून )
३ ,, ,, रामचंद्र रामकृष्ण सामंत,
( खजिनदार ता. १७।४।४० पर्यंत )
४ ,, ,, गो. का. गाडगीळ बॅरिस्टर.
५ ,, ,, रा. बा. वैसास ( दु. ख. )
६ ,, ,, के. गो. बुटी
७ ,, ,, र. भा. पुरंदरे ( दु. चि. )
८ ,, ,, द. वि. सहस्त्रबुद्धे
९ ,, ,, द. दा. रासने ( १२।१०।४० पासून )
१० ,, ,, दा. वि. सांवारे ( ,, )

टीप—१ ज्यांच्या नांवाच्या आधी " ट्र " असें अक्षर आहे, ते संस्थानचे ट्रस्टी असल्यामुळें संस्थान कमिटीचे तहाहयात सभासद आहेत सबब त्यांची नांवें मतपत्रिकेंत घालण्याची नाहींत.

२ ज्यांच्या नांवाच्या आधी " नि " असें अक्षर आहे, ते निवडून आले आहेत असें समजावें. अर्थात त्यांचीं नांवें मतपत्रिकेंत घालण्याचें कारण उरलें नाहीं.

३ ज्यांच्या नांवाच्या आधीं * अशी फुली आहे ते चालू संस्थान कमिटीचे सभासद आहेत व ते नवीन कमिटीवर फिरून निवडून येण्यास लायक आहेत. चालू संस्थान कमिटीची यादी सोबत दिली आहे ती पहा.

४ ज्यांच्या नांवांच्या शेवटीं आंकडा आहे, तो त्या सभासदांनीं चालू सं. कमिटीच्या एकंदर सभा १२ झाल्या त्यापैकीं किती सभांना ते सभासद हजर होते हें दर्शवितो.

सूचना:—कोणाचे नांवांत चूकभूल आढळून आलेस व त्याचप्रमाणें कोणाचे पत्त्यांत बदल झाला असलेस आठ दिवसांचे आंत कळविणे. आठ दिवसानंतर रिवाजाप्रमाणें वर्तमान पत्रिका पाठऊन मतें मागविणेंत येतील ( श्री. साईलीला अंक १० वर्ष २ चा पहा ).

श्री. ना. खारकर,
ऑ. चिटणीस,
शि. सं. कमिटी

३७ चरईरोड, ठाणें.
ता. १३ फेब्रुवारी १९४१

# श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीकरितां पुस्तकें.

(१) सच्चरित किं. रु. ३॥
(२) दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवन मंजरी
(३) ,, (अध्याय)
(४) सगुणोपासना ‌ ८=
(५) प्रधान पुस्तक (इंग्रजी) १
(६) शिरडी गाईड (,,) ८=
[7] R. Vanchinathan, 30, N V. Chetty street, Triplicane, Madras [for the coloured Pictures & silver lockets]

वरील पुस्तकांकरितां व शिवाय मद्रासचे बी. व्ही. एन. स्वामीकृत इंग्रजी पुस्तकें व बाबांचे विश्वसनिय फोटो वगैरे करितां खालील पत्त्यावर लिहून खुलासा घ्यावा:—

(१) कारकून, शि. संस्थान, मु. शिरडी व पो. राहते जि. अहमदनगर

(२) रा. रा. रामचन्द्र वासुदेव घैसास,
एडिटर, साईलीला, गोखले रोड (नॉर्थ)
दादर, मुम्बई १४.

सौ. इंदिराबाई सुर्वेचे बाबांचे रंगित चित्र रा. रा. दा. वि. सांबारे, विलेपार्ले यांचेकडे मिळेल.

रा. रा. वामनराव प्राणगोविंद पटेल, हेडमास्तर सोसाइटी हायस्कूल, उमरठे जि. कचरा यांचेकडे मिळणारी पुस्तकें:—

(गुजराथी) मनाचे श्लोक, हरीपाठ व गुरुस्तुती.

श्री. साईनाथ भजन माला (श्रीमती सावित्रीबाई तेंडुलकर कृत)
डॉ. व्ही. रघुनाथ L. M. 8s. वांद्रा यांचेकडे मिळेल.

All correspondence regarding Shri Sai Leela should be addressed to-Editor Sai Lila, GokhaleRoad (North), Dadar, Bombay 14.

छातीचे विकारावर

सांड् ब्रदर्स यांचे

# हार्टिना

Regd.

(HEARTINA)

# HEARTINA

excellent Heart Tonic

छातींत कळा येणें, सुई टोंचल्या सारखें वाटणें, छातींत धडधड होणें, फुप्फुस विकार, High Blood Pressure इत्यादि विकारांवर रामबाण.

**बा. किं. रु. ३ (ट. ख. नि.)**

सविस्तर माहितीसाठीं लिहा:—

**द. कृ. सांड् ब्रदर्स, चेंबूर, लि.**

आर्यौषधि कारखाना.

**चेंबूर--मुंबई.**

९८१

सूचना:—कोणास जाहिराती देणें असल्यास खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करा

रामचंद्र वासुदेव घैसास लो. टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नं. २, गोखलेरोड नॉर्थ, दादर

Printed at Calendar Press, Dadar and Published by R. V. Ghaisas-Lokamanya Tilak Jubilee Trust Bldg. No.2, Gokhale Rd. North, Dadar, Bombay 14